**शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार अनधिकृत शाळांविरुध्द कारवाई करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक- संकीर्ण -२००९/(९१३/०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ जून २०१०.

**शासन निर्णय :-**

शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी दि. १ एप्रिल २०१० पासून सुरु झालेली आहे. सदर कायद्यातील कलम १८ अनुसार कोणतीही शाळा संबंधित शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यता/ना हरकत प्रमाणपत्राशिवाय सुरु करता येणार नाही. कलम १८(५) अनुसार जर राज्य शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या परवानगी/ मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा चालविण्यात येत असेल अथवा शाळेची मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा चालविण्यात येत असेल तर संबंधिताना रु.१ लाखपर्यंत दंडाची रक्कम व त्यानंतरही शाळा अनधिकृतरित्या चालू राहिल्यास **रु. १० हजार प्रतिदिवशी दंड** करण्याची तरतुद अधिनियमात करण्यात आलेली आहे.

२. राज्यामध्ये शासन परवानगी/ मान्यता प्रमाणपत्राशिवाय अनधिकृतरित्या सुरु असणाऱ्या अनधिकृत शाळांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याच्यादेखील शासनाच्या सूचना आहेत. तरीदेखील अनधिकृत शाळा सुरु रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. अनधिकृतरित्या शाळा सुरु राहिल्याने तेथील कर्मचारी, विद्यार्थी व पालकांची फसवणूक केली जाते. शासनाकडे परवानगीसाठी प्रस्ताव दाखल करायचे व परवानगी आदेश मिळालेले नसतानादेखील शाळा सुरु करायची अशी बरीच प्रकरणे शासनाच्या निदर्शनास आली आहेत.

३. अनधिकृतरित्या चालविण्यात येणाऱ्या शाळांसंदर्भात शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार अंमलबजावणी करण्याचा निर्णय सदर शासन निर्णयानुसार घेण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये अनधिकृतरित्या कोणतीही शाळा सुरु राहिल्यास संबंधित अनधिकृत शाळेच्या व्यवस्थापनास रु.१ लाख इतका दंड व सूचना देऊनही शाळा बंद न केल्यास रु. १० हजार प्रतिदिवशी इतका दंड ठोठावण्यात येईल.

४. राज्य मंडळाशी संलग्नित शाळांकरिता राज्य शासनाचे परवानगी आदेश व सीबीएसई/ आयसीएसई/ आयबी/ आयजीसीएसई/ सीआयई आदी मंडळांशी संलग्नित शाळांकरिता राज्य शासनाचे

ना हरकत प्रमाणपत्र या आदेशांशिवाय शाळा सुरु करण्यात आलेली असेल तसेच मान्यता काढून घेतलेली जर एखादी शाळा सुरु असेल तर अशा शाळेस अनधिकृत शाळा म्हणून घोषित करण्यात यावे. अशा शाळांची यादी शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहीर करावी. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये तसेच या शाळांविरुध्द दंडात्मक कारवाई केली जाईल याचादेखील उल्लेख वृत्तपत्रीय बातमीमध्ये करण्यात यावा. दि. ३० जूननंतर या शाळा सुरु राहिल्यास यासंदर्भातील अहवाल शिक्षण संचालक यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात यावा व अशा अनधिकृतरित्या सुरु असलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१००६१९२०१८२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक), जिल्हा परिषदा / सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
निवड नस्ती माशि-१.